१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

लोकशाही

लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

www.lokshahilive.com

जळगाव ■ अंक – २८० ■ सोमवार, दि.१९ ऑगस्ट २०२४ संपादिका : सौ. शांता वाणी ■ पाने ६ ■ किंमत ३ रु. ■ RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 lokshahilive@gmail.com

सोने-चांदी
- सोने (प्रति १० ग्रॅम) : ७१,४००
- चांदी (प्रति १ किलो): ८३,४६०

तापमान
- कमाल : ३७ अंश सेल्सिअस
- किमान : २० अंश सेल्सिअस

महत्वाचे

कारच्या धडकेत शेतकऱ्याचा मृत्यू

पहूर : शेतातील काम करून मोटरसायकलने घराकडे येत असताना गणेश नर्सरी जवळ जळगाव छत्रपती संभाजी नगर रस्त्यावर दुचाकीला कारणे दिलेल्या धडकेत ज्ञानेश्वर उर्फ बाळू रामकृष्ण तरवडे राहणार पहूर पेठ वय ४३ हे गंभीर जखमी झाल्याने संध्याकाळी त्यांना पहूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांना मृत घोषित केले. शेतातील काम झाल्यानंतर संध्याकाळी घरी परत येत असताना जळगाव छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर गणेश नर्सरी जवळ रस्ता ओलांडात असताना एम एच १९ ई जी ४७०१ या इको कारणे मागून धडक दिल्याने यात ज्ञानेश्वर तरवाडे गंभीर जखमी झाले. घटनास्थळी पहूर येथील ग्रामीण रुग्णालयाचे कर्मचारी देवेंद्र घोंगडे, संदीप घोंगडे, यांच्यासह पहूर पेठ चे सरपंच अफजल तडवी, सलीम शेख गाणी यांनी घटनास्थळी पोचून तातडीने मदत कार्य केले. अपघातग्रस्त वाहनाने ग्रामीण रुग्णालयात दाखल करून पहूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर राहुल निकम यांनी तपासणी केल्यानंतर ज्ञानेश्वर तरवाडे यांना मृत घोषित केले. ईको वाहनाचे चालक इमरान अलीम पटेल व ३१ राहणार नांदेड तालुका धरणगाव याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

ज्युनिअर एनटीआरला मोठी दुखापत

बंगळुरू : चित्रपटाच्या शूटिंगवेळी ज्युनिअर एनटीआरला मोठी दुखापत झाल्याचे सांगितले जातंय. ॲक्शन सीन शूट करण्यात असताना ही दुखापत ज्युनिअर एनटीआर याला झालीये. ज्युनिअर एनटीआर हा हृतिक रोशनच्या 'वॉर २' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. या चित्रपटाचे शूटिंग मुंबईमध्ये सुरू होते आणि यादरम्यानच ज्युनिअर एनटीआरला दुखापत झालीये. ज्युनिअर एनटीआर याच्या हाताला ही दुखापत झालीये. यामुळे आता चित्रपटाचे शूटिंगही थांबवण्यात आले. हेच नाही तर डॉक्टरांनी ज्युनिअर एनटीआरला पुढील दोन महिने विश्रांती घेण्याचा सल्ला दिलाय.

लोकसभेसारखा दणका देऊ नका रे बाबांनो

लय वाईट वाटतंय : अजित दादांनी व्यक्त केली खदखद : झालेल्या चुकांची मागितली माफी

लोकशाही न्यूज नेटवर्क
पुणे प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीमध्ये अजित पवारांच्या गटाला एकाच जागेवर विजय मिळवता आला होता. मात्र आता संपूर्ण तयारीने अजितदादा विधानसभेच्या तयारीला लागले आहे. पुण्यातील आंबेगाव येथील सभेत त्यांनी आपली खदखद व्यक्त करून दाखवत मतदारांना भावनिक साद घातली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या आधी राज्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनसन्मान यात्रा काढली आहे. या यात्रेलाही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असलेला पाहायला मिळत आहे. लोकसभेमध्ये अजित पवार गटाची एकच जागी आली होती. इतर जागांवर त्यांना पराभव पत्कारावा लागला होता. त्यामुळे विधानसभेआधी अजितदादा आपली संपूर्ण ताकद लावताना दिसत आहे. पुण्यातील आंबेगाव येथील सभेमध्ये बोलताना अजित पवारांनी लोकसभेला झालेल्या पराभवाची खदखद व्यक्त केली. त्यासोबतच झालेल्या चुकांची माफीसुद्धा मागितली.

लोकसभेसारखा दणका देऊ नका रे बाबांनो, लय वाईट वाटतंय. बेंबीच्या देठापासून अगदी घाम निघेपर्यंत ओरडून सांगतोय पण समोरच्यांनी देवळात वाजवायची घंटा माझ्या हाती दिली. अशी खंत वजा साद उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मतदारांना घातली. आता तुमच्या कांदा, टोमॅटो वर कधीचं निर्यात बंदी आणणार नाही, पंतप्रधान नरेंद्र मोदींना तसं आवर्जून सांगितलं आहे. आता आम्ही सत्तेत असल्यानं हे झालं. तुमचा खासदार अमोल कोल्हेला हे सांगितलं तर ते काय म्हणणार? मी तर सत्तेत नाही. तेच जर तुम्ही शिवाजी आढळरावांना निवडून दिलं असतं तर? असं म्हणत अजित पवारांनी खंत व्यक्त केली. सहकारी संस्थांच्या माध्यमातून इथल्या शेतकऱ्यांच्या जीवनात जनतेच्या जीवनात एक आर्थिक क्रांती घडवून आणलेली आहे आंबेगाव तालुक्याचा विकास झालेला आहे हे कोणी नाकारू शकत नाही. एकदम कोणी उठत आणि नेता व्हायला लागतं हे येड्या गाबळ्याचे काम नाही त्यासाठी २० ते २५ वर्षे घासायला लागतात, असं म्हणत अजित पवारांनी देवदत्त निकम यांना नाव न घेता टोला लगावला. काहीजण बोलतात ही योजना बंद होईल. आम्ही काम करणारी माणसे आहोत. मागच्या वेळेस एकदा वीज माफी केली होती त्यावेळी निवडणुका झाल्या आणि मला सांगितलं गेलं आता निवडणुका झाल्या योजना बंद. आता लोकसभे सारखा दणका दिला तर या योजना बंद आणि तुम्ही महायुतीला साथ दिली तर योजना सुरू राहणार, असंही अजित पवार म्हणाले. दरम्यान पुण्यातल्या जनसन्मान यात्रेत अजित पवारांनी संजय राऊतांसह विरोधकांना उत्तर दिलं. अजित पवार म्हणाले, कोण आम्हाला शिव्या देतं आहे, कोण शाप देतं आहे? कोण कुणाला सरडा, ढेकूण म्हणतं आहे? मात्र यामुळे राज्याचे प्रश्न सुटणार

पान २ वर »

स्वामिनारायण मंदिरात भव्य हिंदोळा महोत्सव

मंदिराच्या विकासासाठी चंद्रकांत पाटील यांची ५० लक्ष रुपये निधीची घोषणा

लोकशाही न्यूज नेटवर्क
सावदा प्रतिनिधी

श्री स्वामिनारायण मंदिर सावदा येथे भव्य हिंडोळा महोत्सवाचे आयोजन आषाढ व श्रावण या महिन्यांमध्ये हिंडोळा उत्सव अतिशय उत्सवात साजरा केला जातो. परंपरेप्रमाणे याही वर्षी अतिशय भव्य प्रमाणामध्ये हिंडोळा उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. श्री स्वामिनारायण युवक मंडळ या समस्त सावदा शहरातील तरुणांनी अतिशय उत्कृष्टरित्या स्वामिनारायण भगवंतांच्या वेगवेगळ्या ३९ रूपांचे

हिंडोळ्यामध्ये सर्व नागरिकांना, सत्संगी जनांना दर्शन घडविले. साडेपाच हजार वर्षांपूर्वीची परंपरा असणारी ही प्राचीन परंपरा स्वामिनारायण संप्रदायात अडीचशे वर्ष सुरू असणारा हा हिंडोळा महोत्सव अतिशय उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यकर्ते आणि मंदिरचे कोठारी स्वामी स्वयंप्रकाशदास, कोशींद्रा गुरूलचे शास्त्री स्वामी भक्तिस्वरूपदास, सावदा गुरुकुलाचे स्वामी अनंतप्रकाशदास, केवडीया गुरुकुलाचे शास्त्री स्वामी धर्मनंदनदास, गढपुरचे स्वामी श्रीजीचरणदास व मंडळातील सावदा शहरातील जेष्ठ संत शास्त्री स्वामी धर्मकिशोरदास, भंडारी स्वामी माधवप्रियदास, भंडारी स्वामी लक्ष्मीनारायणदास, पुजारी स्वामी सत्यप्रकाशदास या सर्व मुख्य संत गणांच्या उपस्थितीमध्ये चंद्रकांत निंबाजी पाटील, आमदार मुक्ताईनगर विधानसभा क्षेत्र यांनी या हिंडोळा महोत्सवाचे उद्घाटन केले. तदनंतर या हिंडोळा महोत्सवाची महाआरती समस्त हारिभक्तांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आली. मंदिराला शासना मार्फत तीर्थक्षेत्र क हा दर्जा देण्यात आला. यावेळी चंद्रकांत पाटील यांनी मंदिराच्या विकासासाठी रू. ५० लक्ष निधीची घोषणा केली तसेच हिंडोळा देखावे तयार

पान २ वर »

विधानसभेत १०० महिला पाहायला मिळतील

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई प्रतिनिधी

काही लोकं लाडकी बहिणी योजना बंद होईल असं सांगत आहे. ही योजना बंद करण्यासाठी कोर्टातही गेले. सावत्र भावांवर विश्वास ठेवू नका, हे भाऊ कालही काही देत नव्हते आणि आजही काही देत नाहीत. तुमच्या आर्शीवादाने आपल्या सरकारने ३१ मार्चपर्यंतचे पैसे बजेटमध्ये ठेवले आहेत. सरकार पुन्हा येणार आणि पुन्हा एका पैशाचे पैसे ठेवणार. बजेटमध्ये नियमाने एकाच वर्षाचे पैसे ठेवता येतात, जर पाच वर्षांचे ठेवता आले असते तर आता ठेवून दिले असते. पण तुम्ही काळजी करू नका जोपर्यंत महायुतीचे सरकार आहे तोपर्यंत ही योजना

कोणी बंद करू शकणार नाहीत, असा शब्द देवेंद्र फडणवीस यांनी सर्व महिलांना दिला. महिलांच्या जीवनामध्ये परिवर्तन होत आहे. मोदीजींनी सांगितलंय २०२७ नंतर जेवढ्या निवडणुका होणार आहेत. विधानसभा आणि लोकसभेमध्ये महिला प्रतिनिधी निवडून जाणार आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभेत १०० महिला पाहायला मिळतील तर लोकसभेमध्ये दुप्पट महिला पाहायला मिळतील. मोदीजांनी देश चालवायचीच जबाबदारी महिलांकडे दिल्याचं देवेंद्र फडणवीस म्हणाले. मला कोणी देवेंद्रजी म्हणतं, देवेन भाऊ म्हणतं, देवेन भाऊ म्हणत पण मला माझ्या बहिणा मला जेव्हा 'देवा भाऊ' बोलतात ते सर्वात जास्त आवडतं. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं, विकसित भारत घडवायचा असेल तर आमच्या मातृशक्तीला, बहिणींना देशाच्या मुख्यधारेमध्ये आणल्याशिवाय भारत विकसित होणार नाही. मोदींनी विकसित भारताकरता विकसित महिला, विकसित मातृशक्ती अशा प्रकारचे महिला केंद्रित धोरण सुरू केल्याचं फडणवीसांनी सांगितलं.

पान २ वर »

पंतप्रधानांचा लखपती दीदी ऐतिहासिक मेळावा

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत दि. २५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय लखपती दीदी हा ऐतिहासिक महिलांचा मेळावा जळगाव विमानतळाच्या समोरच्या विस्तीर्ण अशा जागेवर होणार आहे. या मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी या जागेची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत केंद्रीय ग्राम विकास मंत्रालयाच्या संयुक्त सचिव स्वाती शर्मा, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित, जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामीण विकास यंत्रणा या विभागाचे अधिकारी यावेळी उवस्थित होते. शहरासह छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर वाहतुकीच्या दृष्टीने

पान २ वर »

दोन मुलींनंतर नसबंदी शस्त्रक्रिया : विशेष सत्कार

लोकशाही न्यूज नेटवर्क
जामनेर प्रतिनिधी

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद व मुख्यकार्यकारी अधिकारी अंकित यांच्या आदेशानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जामनेर तालुका आरोग्य विभागाच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र नेरी येथे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले. सदर शिबिरात दोन मुलीवर एक तर तीन शस्त्रक्रिया दोन अपत्य असलेल्या पुरुषांवर करण्यात आल्या.

पत्नीस आरोग्याच्या दुष्टीने त्रास नको म्हणून सदर पुरुषांनी स्वतः वर शस्त्रक्रिया करून घेतली. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया

करून घेतल्यामुळे आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. रमेश धापते यांच्या कडून शस्त्रक्रिया केलेल्यांचा शाल पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यापुढे दर आठवल्याला पुरुष नसबंदी शिबिर घेणार असल्याचे डॉ. धापते यांनी सांगितले. शिबिर यशस्वीतेसाठी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश सोनवणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लवी राऊत, डॉ. नरेश पाटील, डॉ. कोमल देसले, डॉ. दानिश खान, डॉ. किरण पाटील तालुका पर्यवेक्षक बशीर पिंजारी, राजेंद्र कुमावत, आरोग्य सहाय्यक दिनकर माळी, विक्रम राजपूत, सोपान राठोड, सुनील बोरसे, किशोर पाटील, रविंद्र सुर्यवंशी, स्वप्निल महाजन व प्रा. आ. केंद्र नेरी च्या सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

लोकसहकार गटाच्या अध्यक्षपदी मनोजकुमार पाटील यांची निवड

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव वृत्तसंस्था

जळगाव जिल्हा गस सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेला लोकसहकार गट गस सोसायटीच्या सभासदांनी बहुसंख्येने हजेरी लावली. या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर लोकसहकार गटाची सभा पार पडली. या सभेमध्ये सहकार क्षेत्रांतील नामांकित असलेले गस सोसायटीचे माजी अध्यक्ष श्री. मनोजकुमार पाटील यांची लोकसहकार गटाच्या अध्यक्षपदी (गस सोसायटी) बहुमताने निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेला गस सोसायटीचे विद्यमान संचालक सुनील सूर्यवंशी, प्रतिभा सुर्वे, अनिल गायकवाड, अजय सोमवंशी व माजी अध्यक्ष सुभाष जाधव माजी संचालक यशवंत सपकाळे, शरद पाटील, हरीश बोन्डे, नथू पाटील सुमित पाटील, स्वप्नील पाटील व लोकसहकार गटाचे असंख्य सभासद हजर होते.

मैत्रीचा गैरफायदा घेत युवतीची समाज माध्यमावर बदनामी

लोकशाही न्यूज नेटवर्क
वरणगाव प्रतिनिधी

मैत्रीपूर्ण संबंधाचा गैरफायदा घेवून युवतीची सोशल मिडीयावर बदनामी केल्याप्रकरणी युवकाविरुद्ध वरणगांव पोलीस स्टेशनला तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात झाला आहे. याबाबत सविस्तर असे कि भुसावळ तालुक्यातील वरणगांव शहरालगत असलेल्या एका गावातील पदवीचे शिक्षण झालेल्या एका तेवीस वर्षीय युवतीचे वरणगांवातील बढे वाड्यात रहिवासी असलेल्या एका युवकासोबत मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले होते. मात्र, युवतीचा दुसऱ्या ठिकाणी विवाह योग जुळून आल्याने युवतीने वरणगांवातील युवकांशी मैत्रीपूर्ण संबंध तोडण्याचा प्रयत्न केला. याचा राग आल्याने सदर युवकाने गेल्या आठ दिवसांपासून युवतीचा पाठलाग करीत तिच्या सोबत काढलेले काही फोटो तिच्या भावी पतीच्या मोबाईलवर टाकुन त्यांचेजवळ युवती बाबत बदनामी केली. यामुळे युवतीच्या भावी पतीने दि. १७ ऑगष्ट रोजी विवाह करण्यास नकार दिल्याने युवतीने आपला भाऊ व इतर नातेवाईक मंडळीसह वरणगांव पोलीस ठाणे गाठले. व पोलीस ठाण्यात अमित जितेंद्र भंगाळे रा.

पान २ वर »

दयनीय रस्त्यावर विद्यार्थ्यांचा जीवघेणा प्रवास

शिरसाळा ते बोदवड एसटी प्रवास असह्य : सार्वजनिक बांधकाम विभागाचे साफ दुर्लक्ष

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

शिरसाळा ते बोदवड रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झली असून विद्यार्थी रोजच या रस्त्याने जीवघेणा प्रवास करत आहेत. शिरसाळापासून चिंचखेडकडे जाताना कोणत्याही क्षणी एसटीचा फार मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता यांर नाही. याला कारण आहे तलावाजवळ असलेल्या एक संपूर्णपणे खराब झालेला रस्ता. या खराब रस्त्यामुळे आधीच एसटीचे अनेक वेळा अपघात झाले आहेत. अश्यातच

विद्यार्थी व गाडीत असलेले पॅसेंजर यांचा जीव ड्रायव्हरच्या सतर्कपणे गाडी चालवल्याने थोडक्यात वाचला आहे. अपघात कोणत्याही क्षणी होऊ शकतो. त्या कारणाने पुलाची दुरुस्ती न झाल्यास लवकरच उपोषणाला बसण्याचा इशारा देण्यात आला आहे. शिरसाळा गावाला अधिकाऱ्यांनी तात्काळ भेट देऊन पाहणी करावी व काम सुरू करावे ही मागणी ग्रामस्थ करीत आहेत. दरम्यान अपघातामध्ये काही जीवित आणि झाल्यास त्याला सर्व अधिकारी जबाबदार राहतील ही त्यांनी जाणीव ठेवावी,

आठ दिवसाच्या आत कामाला सुरुवात न झाल्यास उपोषणाला बसून वेळप्रसंगी रस्ता रोको करू याची जाणीव अधिकाऱ्यांनी घ्यावी असा इशारा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बोदवडतर्फे देनाय्त आला आहे. शिरसाळा ते देवधाबा हा सुद्धा रस्ता शेतकऱ्यांसाठी अत्यंत बिकट परिस्थिती सामना शेतकरी वर्ग करत आहे. त्याकडे कोणी लक्ष देईल का? महिला भगिनी व शेतकरी अत्यंत भयानक बिकट परिस्थितीचा सामना करीत आहे. परंतु जाणीवपूर्वक सिरसाळ्याकडे दुर्लक्ष होत आहे. याकडे सुद्धा शासनाला लक्ष देण्याची गरज आहे.